| | |
|---|---|
| **MHCH080011142022** | संचिका दाखल तारीख : ०९/११/२०२२<br>संचिका नोंदणी तारीख : ०९/११/२०२२<br>संचिका निकाल तारीख : २९/०९/२०२३<br>कालावधी : ०० व. १० म. २० दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर यांच्या न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी– एस. डी. चक्कर )

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमाकं ६६४/२०२२ नि. क्र.**

**CNR No. MHCH080011142022**

(**पोलीस स्टेशन – ब्रम्हपुरी** येथील **गुन्हा नोंद क्र. ४६८/२०२२**
भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३ व ५०६ )

| | |
|---|---|
| **सरकार पक्ष/ फिर्यादी** | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलिस स्टेशन, ब्रम्हपुरी,<br>ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर. |
| **सादरकर्ते** | विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्री जि. एस. राउत |
| **आरोपी** | **कैलास विश्वनाथ मेश्राम,**<br>वय ५२ वर्षे, व्यवसायः– शेती,<br>रा. पातळी (गणेशपुर), ता. ब्रम्हपुरी,<br>जि. चंद्रपूर. |
| **सादरकर्ते** | विधीज्ञ श्री एस. एस. निमजे |
| गुन्हा घडल्याची तारीख | १७/०९/२०२२ |
| फिर्याद दाखल तारीख | १७/०९/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०९/११/२०२२ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | १८/०७/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १८/०९/२०२३ |

| | |
|---|---|
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | ..... |
| निकालाची तारीख | २९/०९/२०२३ |
| शिक्षा झाल्याची तारीख, शिक्षा झाली असेल तर. | ........ |

| आरोपीचा अनु. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौजदारी प्र. संहितेच्या कलम ४२८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कैलास विश्वनाथ मेश्राम, | १९/०९/२०२२ | ४१(अ)(१) सी.आर.पी.सी. प्रमाणे सुचनापत्रावर सोडले. | कलम २९४, ३२३ व ५०६ भांदवी | निर्दोष | ... | निरंक |

## – <u>न्या य नि र्ण य</u> –
## (घोषित दिनांक २९/०९/२०२३)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम २९४, ३२३ व ५०६ प्रमाणे अपराध केल्याबाबत आरोप निश्चीत केलेले आहेत.

**<u>अभियोगपक्षाचे आरोप खालीलप्रमाणे आहेत</u>**:–

**०२.** खबरी जयश्री ज्ञानेश्वर शंभरकर हिने अशा आशयाची खबर दिली की, दिनांक १७.०९.२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजताचे दरम्यान खबरी व तिचे पती ज्ञानेश्वर हे आरोपी कैलास मेश्राम याच्याकडे पैसे मागण्याकरीता जात होते. त्यावेळी

त्यांना आरोपी हे उषा मेश्राम हिच्या घरी बसलेला दिसला तेव्हा त्यांनी बसस्टॉपकडे जाणाऱ्या रोडवर उभे राहून आरोपीला आवाज देवून बोलाविले. आरोपी जवळ आल्यानंतर खबरीने आरोपीला दोन महिन्यासाठी तिचेकडून रु.१०,०००/– मागितले त्याला आता सहा महिने झाले तरी पैसे परत करीत नाही मला अडचण आहे पैसे दया असे विचारली असता आरोपी कैलास मेश्राम याने 'मी तुझे पैसे मागेच मेंडकीचे बाजारामध्ये दिले आता कशाचे पैसे राहीले' असे खोटे बोलल्याने खबरीने त्याला हटकली असता तिच्यासोबत झगडा भांडण करून ''तुझे कशाचे पैसे भोसडाचोदे, तुझ्यासोबत झोपलो का ? त्याचे पैसे देवू तुझे पैसे मी केव्हाच दिले'' असे घानेरडया शब्दात शिवीगाळ करून गालावर दोन थापडा मारले व पुन्हा पैसे मागितले तर चाकू खुपसून जिवाने मारीन अशी धमकी दिली. म्हणुन खबरीने पुढे अनिश्चित प्रकार घडू नये याकरीता रिपोर्ट दिली.

**०३.** खबरी जयश्री ज्ञानेश्वर शंभरकर हिच्या तोंडी खबर आधारे पोलीस स्टेशन, ब्रम्हपुरी येथे अपराध क्र. ४६८/२०२२, भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २९४, ३२३ व ५०६ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अंमलदार यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, आरोपीला अटक केले व तपास पुर्ण करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** दोषारोपपत्र प्राप्त झाल्यानंतर दिनांक १८.०७.२०२३ रोजी सदर खटल्यात दोषारोप ठेवला. तदनंतर आरोपीविरुध्द नि.क्र.११ वर भारतीय दंड विधानाचे

कलम २९४, ३२३ व ५०६ प्रमाणे आरोप निश्चित केले. आरोपीला दोषारोपपत्रामधील आरोप त्याच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितले असता त्याने गुन्हा नाकबुल करुन खटला पुढे चालविण्याची मागणी केली.

०५. आरोपीविरुध्द निश्चीत केलेले आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे खालीलप्रमाणे साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली.

**सरकार पक्षाचे साक्षीदार**

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | जयश्री ज्ञानेश्वर शंभरकर | खबरी (निशाणी क्र. ११) |

**सरकार पक्षाचा कागदोपत्री पुरावा**

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ....... |

**मुद्देमाल/वस्तू**

| अ.क्र | मुद्देमाल/वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ....... |

०६. अभियोग पक्षातर्फे विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जी. एस. राउत व आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री एम. बी. मिसार यांचा युक्तीवाद ऐकला.

०७. अभियोगपक्षाच्या पुराव्याचा विचार करता खालील मुद्दे माझे समोर निष्कर्षासाठी उपस्थित झाले आहे. खालील कारणमिमांसेच्या आधारे मुद्यांचा निष्कर्ष नोंदविण्यात येत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने असे शाबीत केले आहे काय की, दिनांक १७/०९/२०२२ रोजीचे १०.०० वाजताचे सुमारास मौजा कळमगाव, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर येथे आरोपीने सार्वजनिक ठिकाणी खबरी जयश्री ज्ञानेश्वर शंभरकर हिला ''तुझे कशाचे पैसे भोसडाचोदे, तुझ्यासोबत झोपलो काय?'' अशा अश्लील शिवीगाळ केली आणि म्हणून भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २९४ प्रमाणे शिक्षापातर गुन्हा केलेला आहे ? | नाही. |
| २ | अभियोगपक्षाने असे शाबीत केले आहे काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने खबरीला शिवीगाळ केली व तिच्या गालावर दोन थापडा मारहाण करुन दुखापत केली व त्याद्वारे म्हणुन भारतीय दंड विधानाचे कलम ३२३ प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केलेला आहे ? | नाही. |
| ३ | अभियोग पक्षाने असे शाबीत केले काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने वर नमूद खबरीस चाकुने खुपसून जिवे मारीन अशी धमकी देउन फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि म्हणून भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ५०६ प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केलेला आहे ? | नाही. |
| ४ | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

:: **<u>का र ण मिं मा सा</u>** ::

**<u>मुद्दा क्र १ ते ३ बाबतः</u>–**

०८. मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी व संक्षेपासाठी माझे विचारार्थ येथे एकत्रीत घेतलेले आहेत.

०९. सदर खटल्यामध्ये अभियोगपक्षाने खबरी सा.क्र.१ जयश्री ज्ञानेश्वर शंभरकर हिला तपासले आहे. सदर साक्षीदार तपासल्यानंतर विशेष सहाय्यक सरकारी वकीलांनी अभियोग पक्षास या व्यतिरीक्त इतर साक्षीदार तपासणे नाही अशी पुरशिस नि.क्र.१५ वर दाखल केली. अभिलेखावर आरोपीविरुध्द कोणताही सबळ पुरावा आला नसल्यामुळे आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणे बयाण नोंदविण्यात आले नाही.

१०. खबरी जयश्री (सा.क्र.१, नि.क्र.११ वर) हिने तिच्या सरतपासातील पुराव्यात असे कथन केले आहे की, ती आरोपी कैलास मेश्राम याला ओळखते. आरोपी व तिच्यामध्ये फक्त बोलाचाली झाली होती. असे काही घडले नाही की, आरोपीने तिला अश्लील शिवीगाळ केली, तिच्या गालावर थापडा मारल्या व चाकुने खुपसून मारण्याची धमकी दिली. तिने गैरसमजुतीतून आरोपीविरुध्द रिपोर्ट दिली होती.

११. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने सुचक प्रश्न विचारले असता खबरीने हे नाकारले की, दिनांक १७.०९.२०२२ रोजी आरोपी कैलास याने खबरीला अश्लील शिवीगाळ केली, तिच्या गालावर थापड मारली

तसेच चाकुने खुपसून मारण्याची धमकी दिली. खबरीने असे कबुल केले की, आरोपी आणि तिच्यामध्ये तडजोड झाली आहे. नि.क्र.१२ वरील पुरशिसवर तिची सही आहे व त्यातील मजकुर खरा आहे. आरोपी व त्यांच्यात काहीही वाद राहीला नाही, तिच्यावर आज रोजी साक्ष देण्यासाठी कुणाचाही दबाव नाही व तिला आरोपीविरुध्द इतर कोणतेही साक्षीदार तपासावयाचे नाही.

**१२.** वरील परिच्छेदामध्ये चर्चा केलेल्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, खुद्द खबरीनेच अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे आरोपीविरुद्ध गुन्ह्याशी संबंध लावणारा काहीही पुरावा आला नाही. अभियोगपक्षाला भारतीय दंड विधान १८६० चे कलम २९४, ३२३ व ५०६ चे घटक शाबीत करता आले नाही. म्हणुन मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येत आहेत.

**<u>मुद्दा क्र.४ बाबतः</u>** –

**१३.** मी यापुर्वीच मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहे. अभियोगपक्षाला आरोपीविरुध्द आरोप शाबीत करता आले नाही. म्हणुन आरोपी निर्दोष सोडण्यास पात्र आहे. करीता मुद्दा क्र.४ च्या निष्कर्षासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

## :: आदेश ::

१. आरोपी **कैलास विश्वनाथ मेश्राम** याला भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २९४, ३२३ व ५०६ प्रमाणे शिक्षापात्र गुन्ह्यांतुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे पुर्वीचे जामीन रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ) प्रमाणे दिलेला जामीन आजपासुन पुढील सहा महिन्यांपर्यंत अंमलात राहिल.

(*न्यायनिर्णय खुल्या न्यायदालनात घोषित करण्यात आला.*)

Digitally signed by SHRIMANT DWARKADAS CHAKKAR
Date: 2023.09.30 11:03:51 +0530

दिनांकः २९.०९.२०२३.

**(एस. डी. चक्कर)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर